राज्यातील सहकारी रुग्णालयांच्या नोंदणीसाठी निकष/मार्गदर्शक सूचना निश्चित करण्यासाठी समिती गठित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग,

शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण -०५१७/प्र.क्र.५९/१३-स

मंत्रालय विस्तार इमारत,

मादाम कामा रोड,हुतात्मा राजगुरू चौक,

मुंबई -४०० ०३२.

दिनांक : ३१ जानेवारी, २०१८

वाचा- १. समक्रमांक दि. २ नोव्हेंबर,२०१७ रोजीचा शासन निर्णय.

२. सदस्य सचिव तथा उपनिबंधक (सर्वसाधारण), सहकार आयुक्त व निबंधक यांचे कार्यालय, सहकारी संस्था, पुणे यांचे दि. २७ डिसेंबर, २०१७ चे पत्र.

प्रस्तावना :

राज्यामध्ये मुंबई, सोलापूर, अमरावती व नागपूर जिल्ह्यात सहकारी रुग्णालये कार्यरत असून, राज्यातील जनतेची आरोग्याची निकड लक्षात घेता सर्वसामान्य नागरीकांना वैद्यकीय सुविधा माफक दराने मिळण्यासाठी सहकारी रुग्णालयांच्या स्थापनेसाठी प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने सहकारी रुग्णालयांची नोंदणी करण्यासाठी काही निकष /मार्गदर्शक सूचना निश्चित करण्यासाठी वाचा क्र. १ येथील शासन निर्णयान्वये समिती गठित करण्यात आली होती. सदर शासन निर्णयान्वये समितीला शासन निर्णयाच्या दिनांकापासून ४५ दिवसात शासनास अहवाल सादर करण्याची मुदत देण्यात आली होती. परंतु विधानमंडळाचे हिवाळी अधिवेशन तसेच कृषी कर्जमाफीचे कामकाज यामुळे उक्त वेळेत अहवाल सादर करणे शक्य न झाल्याने वाचा क्र. २ येथील पत्रान्वये अहवाल सादर करण्यास मुदतवाढ देण्याची विंनती केली होती. सदर विनंतीच्या अनुषंगाने अहवाल सादर करण्यास मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

राज्यात विविध जिल्ह्यांसाठी सहकारी रुग्णालये स्थापन करण्याच्या प्रस्तावांच्या अनुषंगाने सहकारी रुग्णालयांची नोंदणी करण्यासाठी निकष/मार्गदर्शक सूचना निश्चित करण्यासाठी वाचा क्र. १ येथील शासन निर्णयान्वये गठित करण्यात आलेल्या समितीस निकष /मार्गदर्शक सुचना निश्चित करण्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यास या शासन निर्णयान्वये एक महिन्याची मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०२०११२०१२९०३०२ असा आहे.हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Ramesh Jayaram Kadam

Digitally signed by Ramesh Jayaram Kadam
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing and Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=931a917c29ea693ba9abee543d58bf1b6ade60ae69c9be92f59d232bb3a3fcc8, serialNumber=c8fbeb4e149e205d858dabb5d81a2a90a8deb719257572300ef79cfab47d9345, cn=Ramesh Jayaram Kadam
Date: 2018.02.01 12:07:10 +05'30'

(रमेश ज.कदम)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय,मुंबई.
२) अप्पर मुख्य सचिव (सहकार) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय,मुंबई.
३) सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य,पुणे
४) सचिव,राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण , महाराष्ट्र राज्य,पुणे
५) सर्व सह/उप सचिव,सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय,मुंबई
६) निवडनस्ती

प्रति,

१. डॉ. आनंद जोगदंड, समितीचे अध्यक्ष तथा अप्पर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था पुणे.
२. डॉ. अर्चना पाटील, समिती सदस्य तथा अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा ,पुणे.
३. श्री. नंदू लाड, समिती सदस्य तथा चेअरमन, सुश्रुषा रुग्णालय, रानडे रोड, दादर (पूर्व).
४. डॉ.विजयकुमार आरकाल, समिती सदस्य तथा चेअरमन,श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालय आणि संशोधन केंद्र सोलापूर.
५. डॉ. राजेंद्र गणेडीवाल, रुग्णालय प्रमुख, धन्वंतरी सहकारी रुग्णालय,अमरावती.
६. डॉ. के. अनिल रॅाय, आरोग्य वैद्यकिय अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी,पुणे.
७. उपनिबंधक(सर्वसाधारण), सहकारी संस्था, पुणे